# महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार

**श्रीमती उर्मिला राजेंद्र कदम,** ग्रंथपाल, कमला कॉलेज कोल्हापूर

---

**महात्मा गांधींचे जीवन कार्य:-**

अतिशय सरळ मार्गी जीवन जगणारी व्यक्ती असा नावलौकिक असणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असून त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1969 रोजी गुजरातमधील पोरबंदर या गावी झाला.30 जानेवारी 1948 रोजी महात्मा गांधींचे निधन झाले, त्यांची नथुराम गोडसेने गोळ्या घालून हत्या केली. 2 ऑक्टोबर या गांधींच्या जन्मदिनानिमित्ताने संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक अहिंसा दिन म्हणून घोषित केला. सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधींना राष्ट्रपिता ही पदवी दिली तर रवींद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम गांधीजींना महात्मा ही पदवी दिली व महात्मा गांधींनी त्यांना गुरुदेव ही पदवी बहाल केली. 1930 साली अमेरिकेच्या टाईम मासिकाने महात्मा गांधींना म□ऑफ द इयर हा पुरस्कार दिला.एकदा ट्रेनने प्रवास करताना त्यांचा एक चप्पल खाली पडले तर त्यांनी आपला दुसरा जोडा खाली फेकून दिला. सोबत असलेल्या माणसाने विचारले असे का? त्यावर त्यांनी सांगितले मला या एका जोड्याचा उपयोग नाही पण तो ज्याला सापडेल त्याला किमान त्या दोन्हींचा वापर करता येईल. महात्मा गांधींनी स्वतःच्या आत्मचरित्रामध्ये लिहिलेले आहे की लहानपणी ते एक खूप लाजाळू व्यक्ती होते आणि शाळेतून पळून जायचे व इतरांशी बोलताना त्यांना फारच संकोच वाटत असे

1931 मध्ये महात्मा गांधींनी प्रथमच रेडिओवर भाषण केले त्यावेळी त्यांचे पहिले वाक्य होते क्या मुझे इस मायक्रोफोन के अंदर बोलना पडेगा. महात्मा गांधींच्या नावावर परदेशामध्ये 48 मोठे रस्ते असून तर भारतामध्ये 53 मोठ्या रस्त्यांना गांधीजींचे नाव देण्यात आले आहे. स्वातंत्र्यानंतर काही इंग्रजी पत्रकार त्यांची मुलाखत घेण्यासाठी आले व इंग्रजीतून प्रश्न विचारू लागले त्यावेळी त्यांनी सांगितले, आता माझा देश स्वतंत्र झाला असून मी माझ्या मातृभाषेतूनच तुमच्याशी संवाद साधेन. गांधीजी पाच वेळा नोबेल पुरस्कारासाठी नामांकित झाले. 1948 साली पुरस्कार मिळण्यापूर्वीच त्यांची हत्या करण्यात आली. नोबेल समितीने त्या वर्षीचा पुरस्कार इतर कोणत्याही व्यक्तीस दिला नाही. गांधींच्या हत्तेनंतर त्यांच्या अंत्ययात्रेत करोडोच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. लाखोंच्या घरात अंत्ययात्रेच्या मार्गावर लोक उभे होते. त्यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी अतिशय मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

**महात्मा गांधींचे शिक्षणातील योगदान:-**

गांधीजींचे शिक्षणातील योगदान समजून घेण्यापूर्वी त्यांच्या शिक्षण संबंधीच्या संकल्पना समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे.

१) सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना शिक्षण मोफत व सक्तीचे दिले गेले पाहिजे.

२) हस्तकला केंद्रित शिक्षण दिले गेले पाहिजे.

३) यंत्रमाग, उद्योग, हस्तकला इत्यादी शिक्षण दिले जाईल ज्यामध्ये शेती लाकूडकाम,सुतकाम, मत्स्यपालन, बागकाम, मातीकाम, सूतकताई इत्यादींचा समावेश असेल.

गांधीजींच्या शिक्षण विषयक विचारांमध्ये स्वावलंबी बनवणाऱ्या शिक्षणावर भर देणे अपेक्षित आहे. जेणेकरून व्यक्तींचा सर्वांगीण विकास होईल आणि माणूस स्वतःच्या बळावर जीवनात प्रगती करू शकेल असे त्यांचे मत होते आणि त्यामुळे त्यांना मूलभूत शिक्षण पद्धतीचे जनक म्हणून ही पाहिले जाते. गांधीजींनी शिक्षणाशी संबंधित आणखी काही गोष्टी समोर ठेवल्या आहेत.

१) स्वतःच्या अनुभवातून शिकणे आणि प्रत्यक्ष आचरण करणे कोणतीही गोष्ट स्वतः करून बघण्याकडे त्यांचा कल होता. स्वयंशिक्षण हेच सर्वात श्रेष्ठ शिक्षण आहे असे त्यांचे मत होते. पुस्तकी ज्ञानापेक्षा कृती आधारित शिक्षण प्रणालीवर त्यांचा विश्वास होता.

गांधीजींनी शारीरिक हालचालींद्वारे शिक्षणावर भर दिला ज्यामुळे सर्व वयोगटातील मुलांना त्यांच्या

क्षमतेनुसार काम दिले पाहिजे, ज्यामुळे आयुष्यामध्ये वाटचाल करताना मजबूत विचार व शारीरिक शक्ती कमवू शकतील असे त्यांना वाटत होते.

२) हस्तकला चित्रकला यासारख्या विविध क्रिया कला आणि शिक्षणाचे प्रकार मनुष्याला एकमेकांच्या जवळ आणतात आणि यांचा समन्वय साधून शिकविण्याकडे गांधीजींचा कल होता.

14 वर्षापेक्षा जास्त वयाच्या मुलांना पूर्णपणे रोजगार आधारित शिक्षण देण्यावर गांधीजींचा जास्त भर होता. ज्यामुळे मुले पुढे रोजगार मिळवू शकतील. गांधीजींच्या दृष्टिकोनातून शिक्षण व्यवस्थेमधील सहयोगात व कृती वैयक्तिक जबाबदारी यावर त्यांचे एकमत होते. त्यांच्या दृष्टिकोनातून शिक्षणामध्ये शिस्तीला खूप महत्त्व होते विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याबरोबरच शिक्षकांना ते ब्रह्मचर्य व स्वयं संयमी जीवन जगण्याचा सल्ला देत असत. गांधीजींच्या दृष्टिकोनातून विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये सत्य, अहिंसा, सहिष्णुता, प्रेम, न्याय आणि कठोर परिश्रम हे गुण विकसित करणे गरजेचे आहे असे त्यांना वाटे.

"जे मुक्त करते ते ज्ञान" ज्ञानामुळे मनुष्याच्या आयुष्याच्या चौकट आणि विचारांच्या पलीकडे जाऊन आयुष्याकडे बघू शकतो. ज्या गोष्टीतून कृतीतून ज्ञान मिळतं अशी कोणतीही कृती म्हणजे शिक्षणच आहे. शिक्षणाचा संबंध हा फक्त पाठ्यपुस्तक आणि अभ्यासक्रमाशी नसून प्रत्यक्ष अनुभवातून जिवंतपणातून मिळतो ते ज्ञान. अनुभवा आधारित शिक्षण पद्धतीचा आग्रह धरणाऱ्या अनेक विचारवंतांपैकी महात्मा गांधी हे एक अग्रेसर नाव आहे. महात्मा गांधीजींनी अनेक शैक्षणिक प्रयोग केले त्यामध्ये दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रम व भारतामध्ये शांतिनिकेतन, साबरमती आश्रम या ठिकाणी हे शैक्षणिक प्रयोग केले. या विविध शैक्षणिक प्रयोगातून पुढे 1937 साली नई तालीम ही महात्मा गांधी प्रणित शिक्षण प्रणाली उदयास आली. यामध्ये हस्तकला,कला, आरोग्य आणि शिक्षण या चार गोष्टींचा अतिशय सुरेख मिळ घातला आहे. केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा शारीरिक आणि बौद्धिक अशा दोन्ही श्रमांची जोड घालून शिक्षण द्यावं असा विचार या शिक्षण पद्धतीमध्ये होता. गांधीजींना अभिप्रेत ही कृती शिक्षण पद्धती होती, हात, पाय, कान, नाक आणि डोळे यांच्या योग्य वापराने आणि प्रशिक्षणाने बुद्धीचा खरं शिक्षण होतं अशी त्यांची धारणा होती. महात्मा गांधींनी प्राथमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, व्यवसाय अधिष्ठित शिक्षण अशा वेगवेगळया पातळयांवर शिक्षणाचा विचार केला. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे, मोफत व मातृभाषेतूनच देण्यात यावे यावर गांधीजींचे विचार पक्के होते. गांधी प्रणित शिक्षणात आश्रमात राहणाऱ्या मुलांना पाणी आणणे, कपडे धुणे, खोल्यांची स्वच्छता, शौचालय स्वच्छ करणे, झाडांना पाणी घालणे, जेवण तयार करणे यासारख्या कामांच्या जबाबदाऱ्यामुळे स्वावलंबन, सहकार्याची भावना, नम्रता, प्रामाणिकपणा, शिस्त वेळेचं नियोजन, चांगलं वर्तन यासारखी मूल्ये विकसित होतात, हसत खेळत शिक्षण व्हावं यासाठी नयी तालीम मध्ये मुलांना आवडेल असे उपक्रम समाविष्ट केले होते. महात्मा गांधींचे आश्रम हे खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या प्रयोगशाळा होत्या. बौद्धिक शिक्षणाबरोबरच श्रमाचे धडे ही या आश्रमात विद्यार्थ्यांना दिले जात. श्रमाला प्रतिष्ठा, महत्त्व देण्याचं शिक्षण विद्यार्थ्यांना मिळे. कोणतेही काम हे कमी आहे असे न मानता अगदी नाभिका पासून ते एखाद्या न्यायाधीशाचे काम, या प्रत्येक कामाला तेवढीच प्रतिष्ठा असते हे शिक्षणातून, श्रमातून विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले जात. गांधींजी स्वतःच्या कृतीतून ते सर्वांना दाखवून देत.

महाविद्यालयीन शिक्षणाचा संबंध हा राष्ट्राच्या गरजांशी असावा उद्योगांना हवे असलेले पदवीधर शिक्षणातून निर्माण व्हावेत तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उद्योगांनी करावा परंतु त्यांच्यावर नियंत्रण शासनाचे असावे अशी शिक्षणप्रणाली नयी तालीम शिक्षण पद्धतीमध्ये होती. कृतीशील आणि उपक्रम पुरक शिक्षण विद्यार्थ्यांना दिल्यामुळे त्या कलाविष्कारातून निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीतून शाळा, महाविद्यालयांना उत्पन्नाचे साधन मिळावे व उत्पन्न वाढावे असे यातून अपेक्षित होते. प्रौढांना साक्षर केल्यामुळे त्यांना आत्मनिर्भर होण्यास मदत मिळेल त्याद्वारे त्यांना फक्त अक्षर ज्ञान नाही तर व्यावहारिक ज्ञान देखील देता येईल असे शिक्षण जीवन शिक्षण अपेक्षित होते. स्त्री आणि पुरुष हे दोघेही समान आहेत आणि त्यांना दोघांनाही ज्ञानाची शिक्षणाची समान संधी उपलब्ध झाली पाहिजे असे त्यांचे सांगणे होते. गांधी प्रणित शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रित होती शिक्षकांची भूमिका ही केवळ मार्गदर्शकाची असावी. मुलांमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या आवडीनुसार त्यांना शिक्षण

देणे आणि त्यांच्या अभिरुचीचा विचार करून त्यांना शिकवण अपेक्षित आहे. चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक स्वतः चारित्र्य संपन्न असणे अतिशय आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. मुलांना शारीरिक शिक्षा द्यायला महात्मा गांधीजींचा नेहमीच विरोध असे त्यांना सुधारण्याची संधी देणारे शिक्षण हे उत्तम शिक्षण असे त्यांचे मत होते.

समारोप

आजच्या जागतिकीकरणाने आणि चंगळवादांन ग्रासलेल्या काळात महात्मा गांधीची एकूणच जिवंत दृष्टी अधिक नैसर्गिक आणि सहज अशा शिक्षण पद्धतीकडे नेऊ शकते. या जीवन आधारित शिक्षण पद्धतीची रुजवात होण्याची आज खरी गरज आहे. शिक्षणाचं क्रयव वस्तूमध्ये रूपांतर होण्याच्या आजच्या काळात महात्मा गांधींची ही केंद्रीय शिक्षण दृष्टी शिक्षणाच्या नव्या दिशा आणि नवे मार्ग यांच्याकडे नक्कीच नेवू शकेल.

संदर्भ:-

१) फडणीस, जगन (मार्च २०२१), महात्म्याची अखेर, आवृत्ती आठवी, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
२) https://mr.wikipedia.org/wikipedia
३) https://www.marathibiography.com/mahatma-gandhi-biography-in-marathi/
४) http://oldgrt.lbp.world/UploadedData/3660.pdf
५) https://bahuvidh.com/marathipratham/